**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com**

**अकोला कृषि हवामान सल्ला** **दिनांक – मंगळवार, १६ जून २०२०**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक १७ जून २०२० ते २१ जून २०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १७/०६ | १८/०६ | १९/०६ | २०/०६ | २१/०६ |
| पाऊस (मिमी) | ८ | १ | १ | १ | १ |
| कमाल तापमान (अं.से.) | ३६ | ३५ | ३६ | ३५ | ३५ |
| किमान तापमान (अं.से.) | २२ | २२ | २३ | २३ | २३ |
| ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९२ | ८८ | ८५ | ८५ | ८० |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ८० | ७५ | ७० | ७० | ६५ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | ७ | ६ | ६ | ६ | ६ |
| वा-याची दिशा | २५७ | २४८ | २४८ | २४८ | २४९ |

| हवामानाचा इशारा | दिनांक १६ जून रोजी बहुतांश ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे व दिनांक १७ जून रोजी बहुतेक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे तसेच दिनांक १८ ते २० जून रोजी तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता. त्यामुळे शेतकरी बंधूनी आपल्याकडील स्तानिक वातावरणचे अंदाज घेऊन शेतकामाचे नियोजन करावे. |
|---|---|

| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
|---|---|---|
| सर्व पिक | | मागील दोन दिवसात बर्याच ठिकाणी चांगला पाऊस झालेला आहे, त्यामुळे शेतकरी बंधूनी या पाउसाचा फायदा घेत शेताची पेरणीपूर्व कामे आटपावी, तसेच पेरणीला योग्य ७५ - १०० मी.मी पाऊस झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये. |
| सोयबीन | पेरणी | शेतकरी बंधूनी या पाउसाचा फायदा घेत शेत पेरणीचे कामे आटपावी, तसेच पेरणीला योग्य ७५ - १०० मी.मी पाऊस झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये. पेरणीपुर्वी बियाण्यास बीज प्रक्रियासाठी रायझोबियम २५ ग्रॅम /किलो, पीएसबी २५ ग्रॅम/किलो, ट्रायकोडर्मं ४ ग्रॅम/किलो, थायरम + कार्बेंडेससीम २+१ ग्रॅम/किलो, या प्रमाणात करावी. |
| कपाशी | पेरणी | या वर्षी कपाशी पेरणीसाठी देशी सुधारित वाण एकेए -५, एकेए-७, एकेए -८ साठी बियण्याचे हेक्टरी प्रमाण १२ ते १५ किलो वापरावे व त्यासाठी मध्यम भारी जमिनी करिता ६० से.मी × १५ से.मी अंतर ढेवावे व अमेरिकन सुधारित जातीमध्ये एकेएच- ०८१ (६० से. मी × ३० से. मी अंतर ढेवावे, यासाठी बियाण्याचे हेक्टरी प्रमाण १० ते १२ किलो वापरावे ), एकेएच- ०९-५ (सुवर्णा, शुबरा), पीकेव्ही - रजत, एकेएच - ८८२८ वाण वापरावे व त्यासाठी लागवड अंतर मध्यम भारी जमिनीकरिता ६० से.मी × १५ से.मी अंतर ढेवावे, ६० से.मी × ३० से.मी अंतर ढेवावे अनुक्रमे या प्रमाणे ढेवावे, यासाठी |

| | | |
|---|---|---|
| | | बियाण्याचे हेक्टरी प्रमाण १० ते १२ किलो वापरावे. देशी संकरीत जात पीकेव्ही-डीएच-१ व पीकेव्ही सुवर्णा वाणसाठी लागवड अंतर ६० × ४५ से. मी ढेवावे व बियाण्याचे हेक्टरी प्रमाण ३.० ते ३.५ किलो वापरावे. खरीप पिकांच्या सुधारित (सरळ) जातीचे बियाणे मिळवावे. संकरीत वाणांच्या तुलनेत सरळ वाणांच्या लागवडीचा खर्च कमी व निव्वळ नफा जास्त येतो. |
| तूर | पेरणी | मौसमी पाऊसाचे पेरणीला योग्य ७५ - १०० मी.मी पाऊस झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये. तूर पिकाकरीता वाण निवडतांना कमी कालावधीसाठी मध्यम जमिनी करिता ( टीएटी -१०, आएसीपीएल ८७, एकेटी-८८११), मध्यम कालावधीसाठी मध्यम ते भारी जमिनीसाठी (बीएसएमआर - ७३६, पिकेवि तारा, बीएसएमआर -८५३), तसेच अधिक कालावधीसाठी भारी जमिनी करिता (आयसीपीऐल – ८७११९th (आशा) व सी-११) वाणांची निवड करावी व बियाण्याचे हेक्टरी प्रमाण १२ ते १५ किलो वापरावे. पेरणीपुर्वी बियाण्यास बीज प्रक्रियासाठी रायझोबियम २५ ग्रॅम /किलो, पीएसबी २५ ग्रॅम/किलो, ट्रायकोडर्मं ४ ग्रॅम/किलो, थायरम + कार्बेंडेससीम २+१ ग्रॅम/किलो, या प्रमाणात करावी. |
| मुग / उडीद | पेरणी | मौसमी पाऊसाचे पेरणीला योग्य ७५ - १०० मी.मी पाऊस झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये. मुग पेरणीसाठी शिफरास केलेल्या जाती मध्ये पिकेवि- ग्रीन गोल्ड, पिकेवि-मुग ८८०२, पिकेवि - एकेएम-४ आणि उडीद पिकासाठी वाण जसे पिकेवि-उडीद -१५, टीएयु - १, टीएयु - २ व पिडीकेवि ब्लाक गोल्ड (एकेयु -१०-१). पेरणीपुर्वी बियाण्यास बीज प्रक्रियासाठी रायझोबियम २५ ग्रॅम /किलो, पीएसबी २५ ग्रॅम/किलो, ट्रायकोडर्मं ४ ग्रॅम/किलो, थायरम + कार्बेंडेससीम २+१ ग्रॅम/किलो, या प्रमाणात करावी. |
| ज्वारी | पेरणी | शिफारसी नुसार ज्वारीची पेरणी साठी लवकर येणारे वाण सीएसएच-३०, मध्यम कालावधीचे वाण सीएसएच-३५, एसपीएच-१६३५, सुधारित जातीमध्ये पीडीकेव्ही कल्याणी, सीएसव्ही-२०, सीएसव्ही-२७, सीएसव्ही-३४ वापरावे. |
| भाजीपाला | | मिरची, वांगी, टोमाटेची, पत्तागोबी व फुलगोबी या पिकांची ४ ते ६ आठवडे वयांचे रोपाची शेतात लागवड करावी. भेंडी, वाल, चवळी, कारली, ढेमसे, भोपळा, कोहळे, दोडके, व अद्रक यांची लागवड करावी.  निशिगंध या फूल पिकांची लागवड करावी. |
| फळझाडे | | लागवडीसाठी खोदलेले खड्डे शेणखत ४-५ घमेले + सिंगल सुपर फॉस्फेट १ ते २ किलो + मिथिल पराथीयान भुकटी साधारण १०० ग्राम या मिश्रणाने भरून ठेवावेत. खड्डे भरतांना मध्यभागी मातीचा उंचवटा करावा व मध्यभागी कडी रोवावी. पेरणीला योग्य पाऊस झाल्यावर रोपांची लागवड करावी.<br><br>संत्रा-मोसंबीचे झाडांना मृग बहाराकरिता दिलेला ताण, पाऊस आल्यास हलके ओलीत देऊन तोडावा शिफारशिनुसार व मातीपरीक्षण अहवालानुसार शेद्रीय व रासायनिक खते तसेच सूक्ष्म अन्नद्रव्ये द्यावीत.<br><br>आंबिया बहाराची फळे असलेल्या संत्रा झाडांना नियमित ओलीत करावे, येत्या दिवसात वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता आहे त्यामुळे फळझाडाचे खोडास १ मीटर उंची पर्यंत बोर्डोपेस्ट लावावी. ( १ किलो मोरचूद -१ किलो कळीचा चुना – १० लिटर पाणी व ५ लिटर गोमुत्र ). |

| | | |
|---|---|---|
| पशु / जनावरे | | शेतकऱ्यांनी गोठा दुरुस्त करावा. छताची छिद्रे बंद करावीत. गोठया भोवती पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. गोठयात ओलसरपणा राहणार नाही याची दक्षता घ्यावी. गोठे स्वच्छ व कोरडे ठेवावेत. चिखल होवू देवू नये. वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता असल्यामुळे जनावरांना व पक्षांना सुरक्षित ठिकाणी ठेवावे. जनावरांना पशुवैदकांचे सल्ल्या नुसार लसीकरण करावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली असून नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.